# घराणे १२ वें, पंचनदी - विनोद

या घराण्याचा ज्ञात मूळपुरुष कृष्णंभट. हें घराणें मूळचें पंचनदीजवळील बोरवलीचें. पुढें कदाचित् क्षेत्र परशुराम येथेंहि कांही काल यांची वस्ती असावी. यादव बाळंभट(३) यांची भार्या आनंदीबाई या आपल्या लेखांत आपला वास्तव्याचा गांव गोवित्री (जि. पुणें) असें लिहितात. यावरुन कदाचित यादवभट गोवित्रीस राहात असतील किंवा आनंदीबाई पतीच्या पश्चात माहेरीं गोवित्रीस राहिल्या असतील. बाळकृष्ण यादव (४) यांचेपासून पुढील पिढया बोरिवलीस थोडे दिवस राहून नंतर ही मंडळी पुणें जिल्हांत वेल्होळी (वेल्हवळी) येथें गेलेली आहेत. नारायण मोरेश्र्वर (७) हे आपलें वास्तव्य किहीम देतात. त्यानंतर हे पेढांबे येथें गेले असावेत. त्र्यंबक बाळकृष्ण (८) आणि प्रभाकर नि विष्णु नारायण (८) यांनी आपलें वास्तव्य पेढांबें (जि. कुलाबा) दिलें आहे. जनार्दन रामचंद्र (५) आणि राधा, भ्र. गोविंद सदाशिव (५) यांनी आपलें वास्तव्य करंजगांव कर्यात मावळ असें दिलें आहे. यावरुन या घराण्यांतील मंडळी प्रथम बोरिवली, परशुराम आणि तेथुन वेल्होळी येथें अनुक्रमें राहात. पुढें सदाशिव मोरेश्र्वर (७) हे नवसारीस मिळकत संपादन करुन तेथें आणि नारायण मोरेश्र्वर (७) हे पेढांबें येथें राहूं लागले असें दिसतें. सध्यां या मंडळीचें वास्तव्य कर्णावतीह (अहमदाबाद), चाळीसगांव, ठाणें, नडियाद, पुणें, बडोदें, मुंबई, लोणावळें, वेल्होळी, सावळी, सुरत इत्यादि ठिकाणी आहे.

कुलस्वामी - हें घराणें मूळचें पंचनदीच्या मोडकापैकी असून यांतील कोणीहि कोळथरें येथील कोळेश्र्वर कुलस्वामी सांगत नाहीत. त्याच्या जागीं पेढें (सध्यांचे क्षेत्र परशुराम) येथील परशुराम (कोणी त्यास भार्गवराम म्हणतात, कोणी काल-काम-परशुराम अशीं तीन नावें सांगतात.) यास कुलस्वामी मानूं लागले. पुढें वेल्हवळीस मिळकत संपादन झाल्यावर - आणि आख्यायिकेप्रमाणें परशुराम बल्लाळ (५) यांनी रामेश्र्वराच्या यात्रेहून येतांना आणिलेल्या तीन शिवलिंगांपैकी एक आपल्या घराशेजारीं स्थापन करुन मंदिर बांधिल्यानंतर - त्या रामेश्र्वरास दुसरा कुलस्वामी मानूं लागले आहेत. या दोन देवतांचे जोडीस योगेश्र्वरी कुलस्वामिनी मानितात.

कुलधर्म - देवदिवाळीस यांचे वार्षिक नैवेद्य असत. सदाशिव मोरेश्र्वर (७) यांचा पुत्र त्र्यंबक हा वेल्हवळीस घराजवळील विहिरींत पडून कुलधर्माचे दिवशींच वारला. त्यामुळें सदाशिव मोरेश्र्वर (७) यांच्या शाखेंत तेव्हांपासून देवदिवाळीचे नैवेद्य बंद होऊन ते पुढें केव्हां तरी होऊं लागले. आज उपलब्ध असलेल्या माहितीवरुन विष्णु नारायण (८) यांच्या शाखेंत देवदिवाळीस नैवेद्य आहेत असें दिसते. नैवेद्याच्या देवता परशुराम येथील परशुराम वा भार्गवराम, कोणी एक मानितात नि कोणी काल-काम-परशुराम अशा तीन देवता मानितात. वेल्हवळीचा रामेश्र्वर, आणि जोगेश्र्वरी या आहेतच. याविरहित विनायक नरसिंह (१०) यांचेकडे वेल्हवळींची ग्रामदेवता वेळूबाई, आणि मळवली जवळील बेहेरगांव येथील बेहेराई, बाबूराव नारायण (१०) यांचेकडे कनकेश्र्वर आणि भोमेश्र्वर या देवता असतात.

कुलाचार - शारदीय नवरात्रांत सर्वोकडे अखंड दीप, माळ, सुवासिनीस भोजन असतें. कांही शाखांत एका व्यक्तीस धान्य फराळ असतो. रामचंद्र वामन (१०) यांच्या शाखेंत वार्षिक नैवेद्याचे दिवशीच शक्यतेनुसार गिरीच्या वेंकटेशाच्या नावें ब्राम्हण भोजन असतें. हा आचार अगदीं अलीकडचा आहे. श्रावणांतील शनिवारीं एका मुंजास स्नान नि भोजन घालतात. हा विनोदांचा विशिष्ठ आचार दिसतो. मंगलकार्यानंतर नि प्रसूतीनंतर सर्वोकडे बोडण आहे. पुत्राचे विवाहानंतर कुलदेवतेच्या दर्शनास ओहर जाण्याचा परिपाठ या घराण्यांत आहे.

वतन - मौजे बोरिवली (ता. दापोली) हा खोती गांव विनोदांचा फार जुन्या काळापासून चालत होता. पुढें विनोदांनी दाबके यांस वतनबंधु मानून त्यांना अर्धी भागीदारी दिली. शक १७३३-३४ पर्यंत हा गांव विनोदांकडे होता. सध्यां तो गणेश जनार्दन (६) यांचे जावई नारायण भास्कर टिळक यांचेकडे गहाण आहे. मौजे पेढें (सध्यांचें क्षेत्र परशुराम) येथील यादव बाळंभट (३) यांची स्वसंपादित मिळकत शक १७३३-३४ च्या सुमारास गहाण होती. ती शक १८११ च्या सुमारास नारायण प्रभाकर (९) यांनी सोडवून ती आपले वहिवाटीस घेतली आहे. वेल्होळी (ता. मावळ, जि. पुणें) येथील मिळकत पूर्वी सामायिक होती. पुढें इतर विनोद मंडळी परस्थळीं गेल्यावर बाळकृष्ण मोरेश्र्वर (७) यांच्या वहिवाटीस राहिली. ती त्यांचे वंशजांकडे आहे. (ऐ. क्र. ४८) यांत उल्लेखिलेलें वर्षासन शक १८२३ पर्यंत संपूर्ण मिळत होतें. त्यावेळी यादव परशुराम (९) यांच्यावर बडोदें राज्यांत राजद्रोहाबद्दल काम चालून त्याच्या वांटणीचे ५० रुपये कापून उरलेल्या शंभरांतील सेटलमेंट खात्याच्या कपाती इत्यादि वजा जातां सध्यां ६१रू. माधव आणि वामन परशुराम (९) यांच्या वंशजांस मिळतात. परशुराम बाळकृष्ण (५) हे आपल्या त्र्यंबकच्या लेखांत वतन बोरिवली आणि घातोंडी असें लिहितात. घातोंडी येथें काय वतन होतें आणि सध्यां त्याची काय स्थिति आहे कळत नाही.

विनोद घराण्याकडून वेल्होळी येथील श्रीरामेश्र्वराचा उत्सव माघ शुध्द १० पासून पौर्णिमेपर्यंत होत असतो. या उत्सवास गणेश जनार्दन (६) यांनी आपल्या वाटयाची मिळकत देवस्थानाप्रीत्यर्थ दिली आहे. (ऐ. क्र. ५८ अ)

या घराण्यांत पिढया १२, एकूण व्यक्ति ११३ नि विद्यमान व्यक्ति ५६ आहेत.

(३) यादव बाळंभट कृष्णंभट - हे कीर्तनकार होते. यांना यादव गोसावी असे म्हणत असल्याचा उल्लेख आढळतो. यांचेपासून या घराण्यांचें मोडक हें उपनांव मागें पडून त्याऐवजी विनोद हे उपनांव चालू झालें. त्यासंबंधानें आख्यायिका अशी एकदा पुण्यास पेशव्यांचे दरबारीं यादव गोसावी यांचें कीर्तन चालू होते. दरबारची मंडळी आणि स्वतः श्रीमंत पेशवेहि कीर्तनात अतिशय तल्लीन होऊन गेले. यादव गोसावी यांच्या कीर्तनांत विनोद बराच असे. कीर्तन आटोपल्यांवर श्रीमंतानी यादव गोसावी यांस आपण मूर्तिमंत विनोद आहांत असे म्हटले. आणि तेव्हांपासून या घराण्याचे विनोद हे उपनांव रुढ झाले. हें मोडक विनोद घराणे रत्नागिरी जिल्हांतील दापोली तालुक्यांतील पंचनदी गांवचें मूळचें राहणारे. पंचनदी गांवचे मोडक हे खोत आहेत. यादवभट यांनी चिपळूण तालुक्यांत मौजे पेढें तर्फ श्रीक्षेत्र परशुराम येथें जमीनजुमला नि घरदार संपादन केले. पुणें जिल्हांत मावळ तालुक्यापैकी मौजे वेल्होळी या गांवी आणि

त्याच्या आसपासच्या गांवी मोडक- विनोद यांच्या जमिनी नि घरें-दारें होती. यांना भार्या दोन. बहुधा पहिलीचा पुत्र धोंडो. दुसरी भार्या आनंदी हिचा पुत्र बाळकृष्ण. आनंदीबाईनी त्र्यंबकच्या लेखांत आपले वास्तव्य गोवित्री दिलें आहे.

(४) धोंडो यादव बाळंभट - भार्या गोपिका. या बाईंनी त्र्यंबकच्या लेखांत आपलें वास्तव्य क्षेत्र परशुराम दिलें आहे.

(४)बाळकृष्ण यादव बाळंभट - हे वास्तव बोरिवली सांगतात. भार्या लक्ष्मी. या बाईनी आपलें वास्तव वेल्होळी दिलें आहे.

(५) परशुराम बाळकृष्ण यादव - हे वेल्होळी गांवी राहात असत. श्रीमंत सरदार राजमाचीकर यांचे बरोबर हे रामेश्र्वराच्या यात्रेस गेले होते. यात्रा करुन परत येतांना यांनी तीन शिवलिंगे आणिलीं होती. परशुरामपंतांनी वेल्होळी येथील घराजवळ वरील तीन शिवलिंगापैकी एका शिवलिंगाची स्थापना करुन तेथें मंदिर बांधिले. नाना फडणिसांच्या कारकिदीत लोहगड किल्ला बांधिला गेला. तो किल्ला बांधिल्यानंतर उरलेल्या साहित्यानें वेल्होळी येथील मोडक-विनोद यांचा वाडा बांधिला अशी आख्यायिका प्रचलित आहे. यांनी आपल्या त्र्यंबकच्या लेखांत वतन बोरिवली आणि धातोंडी असें सांगितलें आहे.

(६) मोरेश्र्वर परशुराम बाळकृष्ण - भार्या काशी. यांना एक कन्या होती. तिच्या कन्येचें नाव धोंडू.

(७) सदाशिव (तात्या) मोरेश्र्वर परशुराम - मृ.स.१८५४ मार्च २९. वय ६६. वेल्होळी येथें राहात. तेथून बडोदें राज्यांत नवसरी येथें गेले. नि तेथें घर बांधून स्थायिक झाले. शक १७५२-५३ पासून यांना बडोदें सरकारकडून प्रतिवर्षी १५० रुपये वर्षासन मिळू लागलें. (ऐ. क्र. ५८) यांनी संन्यास घेतला होता. बडोदें येथें यांची समाधि आहे. भार्या उमा, मृ.श.१७९९ माघ व. २. पि. धोंडोपंत जोशी, कोहीळ, अपत्ये १ कन्या २ पुत्र

(८) कु.चिमा सदशिव मोरेश्र्वर- भ्र. जगन्नाथपंत गोडबोले-दीक्षित, इनामदार, कान्ही (जि. नवसरी).

(८) त्र्यंबक सदाशिव मोरेश्र्वर - वयाच्या ८ व्या वर्षी, सोडमुंज होण्यापूर्वी, देवदिवाळीचे दिवशी वेल्होळी येथें परसांतील विहिरींत पडून वारले. या शाखेंत देवदिवाळीस कुळधर्म होता. तो त्र्यंबक सदाशिव यांच्या मृत्यूपासून या शाखेपुरता त्या दिवशी बंद झाला, पुढें केव्हातरी करितात.

(८) परशुराम सदाशिव मोरेश्र्वर - ज. स. १८२४, मृ. स. १८६६ जून ८. नवधरा संस्थानचे कारभारी होते. याबदल संस्थानाकडून यांना प्रतिवर्षी नक्त ५०० रुपये आणि कुटुंबाचा कच्चा खर्च अशी नेमणूक झाली होती. शिवाय बडोदें राज्यांत छत्री-मशालीचा यांना मान होता. भार्या गंगा (मनू) मृ. श. १८१३ श्रा. व. २. वय ६०. पि. केशव तात्याजी फाटक, बडोदें. अपत्ये १ कन्या ३पुत्र

(९) कु.काशी परशुराम सदाशिव - (सरस्वती) भ्र. विनायक नारायण गोडबोले, बडोदें.ज. श. १७७३ अश्वि. शु. १०. मृ. श. १८५४ मार्ग. शु. १.

(९) माधव परशुराम सदाशिव - ज. श. १७७५ फा. व ५. मृ. श. १८१९ मार्ग. शु. १२. मराठी आणि संस्कृत शिक्षण उत्तम. यांचा परगार्थ साधनाकडे विशेष कल असल्यामुळें यांनी नोकरी-चाकरी केली नाही. शक १८०८ च्या सुमारास नाशिकच्या आणि शक. १८१४ च्या सुमारास काशीची अशा दोन यात्रा पायी प्रवास करुन केल्या. भार्या रमा (आवडी) मृ. श. १८२१. पि. बाळकृष्ण विठ्ठल रानडे, बडोदें.

(१०) यशवंत माधव परशुराम - ज. श. १८१५ चै. व. ८. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सध्यां सुरत नगरपालिकेमध्यें पाणीपुरवठा खात्यांत स्टोअरकीपर आहेत. वास्तव्य वराच्छा वाटर वर्क्स. यांचे प्रपितामह सदाशिव मोरेश्र्वर यांनी संपादन केलेल्या वर्षासनापैकी सध्यां ६१रू.मिळतात. त्यांतील निम्या हिशांचे हे भागीदार आहेत. भार्या (१) अन्नपूर्णा (सखू), मृ. स. १९१९ जाने. २७ व्या वर्षी. पि. हरि गणेश करंदीकर, बडोदें. वि. स. १९१६. भार्या (२) अन्नपूर्णा (गोदावरी), ज. श. १८२७. मृ. श. १८५५ मार्ग. व. १. पि. गणेश व्यंकटेश डोंगरे, बडोदें. वि. श. १८४५. पुत्र श्यामसुंदर. अपत्ये १ कन्या १ पुत्र शामसुंदर, भार्या (३) अन्नपूर्णा, मृ. श. १८६२ फा. व. ५. पि. माधवराव सहस्त्रबुध्दे, बडोदें. वि. स. १९३४. पुत्र अशोक.

(११) कु. कृष्णा यशवंत माधव - ज. श. १८४६ आषा. व. ३०. मराठी शिक्षण चालू. भार्या

(११) श्यामसुंदर यशवंत माधव - ज. श. १८५० आश्वि. शु. १०. शिक्षण चालूं.

(११) अशोक (कुमार) यशवंत माधव - ज. श. १८६० भाद्र. व. ८.

(९) यादव परशुराम सदाशिव - ज. श. १७७७ भाद्र. व. ५, मृ. श. १८३० मार्ग. शु. ५. बडोदें संस्थानांत वकील होते. वृत्ति बाणेदार. यांनी बडोदें संस्थानाच्या कारभारासंबंधी गुजराथच्या वर्तमानपत्रांतून बरीच विरुध्द टीका प्रसिध्द केली. त्यामुळे सन १९०१ मध्यें यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला होता. त्यांत बडोदें वरिष्ठ कोर्टा हे निर्दोषी ठरुन सुटले. परंतु हुजूर कोर्टात यांना ५०० रुपये दंड झाला नि यांना मिळत असलेल्या वडिलार्जित वर्षासनाचा यांचा हिस्सा जप्त करण्यात आला. भार्या यशोदा (नर्मदा), मृ. स. १९२४ ए. ४, वय ६२. पि. रामचंद्र विनायक रानडे, बडोदें. अपत्ये १ कन्या ४ पुत्र

(१०) कु.अंबू यादव परशुराम - ज. श. १८०६, मृ. शे. १८३७. (सत्यभामा), भ्र. अनंत बाळकृष्ण दामले, बडोदें. वि. श. १८१७.

(१०) बापू (सखाराम) यादव परशुराम - ज. श. १७९७ पौ. व. २. मृ. स. १९२६ मार्च ९. शिक्षण इंग्रजी ४ ईयत्ता. बडोदें संस्थानांत सर्व्हे खात्यांत नोकरी होती भार्या लक्ष्मी (नर्मदा), ज. श. १८१० चै. व. ४, मृ. श. १८५४ का. व. ४. पि. अनंतभट जोशी, बडोदें. वि. श. १८२२. अपत्ये २ कन्या ३ पुत्र

(११) कु. मैना बापू यादव - ज. श. १८२६ मार्ग. व. ११. शिक्षण मराठी. भ्र. दत्तात्रेय गोविंद मराठे, बडोदें. वि. श. १८३८.

(११) कु. मथुरा बापू यादव - ज. श. १८३४ फा. शु. ११, मृ. श. १८५२. भ्र. रामचंद्र गणेश बेहेरे, बडोदें. वि. श. १८४९.

(११) दत्तात्रेय बापूराव यादव - ज. श. १८२५ वै. शु. १२. शिक्षण इंग्रजी ६ वी पर्यंत. वडिलांचे आजारामुळें नि सांपत्तिक अडचणीमुळे पुढील शिक्षण झालें नाही. १९२० मध्यें गुरांच्या डॉक्टरी धंद्याचें शिक्षण घेतलें. स. १९२० मध्यें २० रुपये पगारावर नोकरी लागली. पुढें वाढत वाढत व्हेटेरिनरी सर्जन झाले. सध्यां याच हुदयावर बडोदें संस्थानांत सावळी येथें आहेत पगार ९० रुपये. गायन-वादन, चित्रकला यांची आवड असून सामाजिक कार्याची हौस आहे. भार्या सावित्री (इंदिरा), ज. स. १९११ फे. १८. शिक्षण मराठी ५वी पर्यंत. पि. शामराव गोखले, सिध्दपूर (प्रांत मेहसाणा) वि. स. १८२५.अपत्ये १ कन्या ३ पुत्र

(१२) कु.मीनाक्षी दत्तात्रय बापूराव -ज. श. १८६४ आषा. व. १०

(१२) गजानन दत्तात्रेय बापूराव  - ज. श. १८५०. श्रा. शु. ६. विद्यार्थी.

(१२) कृष्ण (किसन) दत्तात्रेय बापूराव  - ज. श. १८५४. प्राथमिक विद्यार्थी.

(१२) प्रभाकर दत्तात्रेय  बापूराव - ज. श. १८५७ वै. शु. ५ प्राथमिक विद्यार्थी.

(११) पुरुषोत्तम बापूराव यादव - ज. श. १८२८ फा. व. ७. बडोदें येथें सर्व्हे खात्यांत नोकरी आहे. बडोदें येथें यांच्या कुटुंबाचें सुकामेवा आणि फळें यांचे दुकान रावपु-यांत आहे. वास्तव्य राजमहालरोड. खंडेरावमार्केट समोर. भार्या कमला (गंगू) ज. श. १८३६ आश्विं. शु. ९. पि. विश्र्वनाथ गणेश (भय्यासाहेब) शेंडे, मूळ गांव गणपति-पुळें, सध्यां बडोदें. अपत्ये १ कन्या १पुत्र

(१२) उषा पुरषोत्तम बापूराव  - ज. स. १९४१ ए. २६.

(१२) सुधाकर पुरुषोत्तम बापूराव - ज. स. १९३७ जुलै १२.

(११) विष्णु बापूराव यादव  - ज. श. १८३७ वै. शु. ६ मॅट्रीक. अहमदाबाद येथें पोलिस इन्स्पेक्टरचे ऑफिसांत रायटर कॉन्स्टेबल आहेत. वास्तव्य ट्राफिक ब्रँच पोलिस इन्स्पेक्टरचे ऑफिस, गायकवाड हवेली, अहमदाबाद.

(१०) गोविंद (सदाशिव) यादव परशुराम - ज. श. १८००. मृ. श.  १८३८. यांचें मूळचें नाव सदाशिव परंतु पुढें गोविंद हेंच नांव रुढ झालें. बडोदें येथील हुजुरात पागेकडे घोडेस्वारांत होते. अविवाहित.

(१०) नारायण यादव परशुराम  - ज. श. १८१०.  शिक्षण इंग्रजी पाच ईयत्ता. बडोदें येथें सरसुभा कचेरीत वारखळी खात्यांत नोकरी आहे. वास्तव्य, शंकर पोळ, रावपुरा. भार्या आनंदी (शांता), ज. श. १८२५ माघ शु. ७. शिक्षण मराठी ४ ईयत्ता. पि. भगवंत भिकाजी म्हसकर, बडोदें. वि. स. १९१५. १ कन्या ३पुत्र

(११) वत्सला नारायण यादव  - ज. श. १८४१ श्रा. शु. ११. भ्र. विष्णु वामन मराठे, बडोदें.

(११) चिंतामणि नारायण यादव - ज. स. १९२३ आक्टो, ४. मॅट्रिकचे वर्गात.

(११) वसंत नारायण यादव - ज. स. १९२८ फे. २. हायस्कूल विद्यार्थी.

(११) मुकुंद नारायण यादव - ज. स. १९३० आग. ६. हायस्कूल विद्यार्थी.

(१०) कृष्णाजी यादव परशुराम - मृ. स. १९१५. मुंबईस पोलिस खात्यांत नोकरी होती. मुंबईस वारले. अविवाहित.

(९) वामन परशुराम सदाशिव - ज. श. १७७९ कार्ति. शु. ४. मृ. स. १९१७ जाने ११. मराठी शालान्त परीक्षा उत्तीर्ण, प्रथम शेतीचा व्यवसाय केला. वयाच्या ४० व्या वर्षानंतर बडोद्यास पगडबंदाचा व्यवसाय करीत असत. यांनी बंडोद्यास रावपु-यांतर घर बांधिले. भार्या यमुना (कुष्णा), ज. स. १८६६, मृ. स. १९३६ जुलै २५. पि. वामन बाजी गोरे, मूळ रत्नागिरी, नंतर बडोदें. ३ कन्या ३ पुत्र

(१०) मनकर्णिका वामन परशुराम - ज. स. १८८६ डिसें. २८. लिहितां वाचतां येतें. (सत्यभामा), भ्र. विश्र्वनाथ अनंत काणे, निवेंडी (रत्नागिरी). वि. स. १८९८ मे ५.

(१०) चिमा वामन परशुराम - ज. स. १९०४ नोव्हे. ५. फीमेल कॉलेजची शेवटची परीक्षा उत्तीर्ण. (सत्यभामा), भ्र. कृष्णाजी गोविंद केळकर, बडोदें, वि. स. १९१७ जून १८. विवाहानंतर तीन महिन्यांनी यांना वैधव्य प्राप्त झाले. नंतर यांनी पुनविवाह केला नंतरचे नाव रमा भ्र. वामन भालचंद्र पळणीटकर, जी. आय. पी. रेल्वे इन्स्पेक्टर मुंबई, वि. स. १९३८.

(१०) द्वारका वामन परशुराम - ज. श. १८३० श्रा. व. शिक्षण मराठी पाच ईयत्त. (सत्यभामा), भ्र. कृष्णाजी गणेश गोखले, मुंबई. वि. स. १९२२ जून ३.

(१०) रामचंद्र वामन परशुराम - ज. श. १८०६ चै. शु. ३. मॅट्रिक. अंध शिक्षणाचे प्रावीण्य संपादन केलें आहे. सध्यां बडोदें येथें मूक नि अंध विद्यालयाचे मुख्याध्यापक आहेत. वडिलार्जित वर्षासचा चौथा हिस्सा यांना मिळतो. भार्या (१) उमा (बजू), ज. स. १८९२, मृ. स. १९१८ मे १७. शिक्षण मराठी, पि. गणेश नारायण लेले, बडोदें. वि. स. १९०४. पुत्र मधुकर. भार्या (२) सीता (गोदावरी तथा काशी), ज. स. १९०५. शिक्षण मराठी नि थोडें इंग्रजी पि. दत्तात्रेय श्रीधर रिसबूड, भिवडी. वि. स.१९१९. ३ कन्या १पुत्र

(११) सुशीला रामचंद्र वामन - ज. स. १९३७ सप्टें. ६. इंग्रजी शिक्षण चालू.

(११ विमल रामचंद्र वामन - ज. स. १९३० जाने. १४. इंग्रजी दुसरी.

(११) कुंदा रामचंद्र वामन - ज. स. १९३८ ऑग. ७.

(११) मधुकर (मधुसूदन) रामचंद्र वामन - ज.श. १८३६ ज्ये. व. ८. मॅट्रिक. बडोदें संस्थानांतील जी. बी. एस्. रेल्वेच्या ऑडिट ऑफिसांत नोकरी आहे. सिव्हिक गार्डचा हुद्दा आहे. भार्या सुमति (शकुंतला) ज. श. १८४४ फा. व. ९. पि. वामन सीताराम जोशी, भिनवालीया (मारवाड प्रांत). वि. श. १८६४.

(१०) लक्ष्मण वामन परशुराम - ज. श. १८१० माघ व. १४, मृ. श. १८३५ मार्ग. व. १. शिक्षण इंग्रजी ५वी. बडोद्यास मुलकी खात्यांत नोकरी होती. अविवाहित.

(१०) नरहरि वामन परशुराम - ज. श. १८१९ वै. शु. ६. शिक्षण इंग्रजी ५ ईयत्ता. चाळीसगांव येथें दांतांच्या चौकटी तयार करण्याचा व्यवसाय करितात. भार्या सरस्वती (कृष्णा), वय ३५. पि. भास्कर त्र्यंबक शिदोरे, इंदूर. वि. स. १९३३.अपत्ये २ पुत्र

(११) विठ्ठल नरहरि वामन - ज. स. १९३६ नोव्हें. ११.

(११) शंकर नरहरि वामन - ज. स. १९३९.

(७) बाळकृष्ण मोरेश्र्वर परशुराम  - मृ. श. १७७५. यांनी आपलें वास्तव्य वेल्होळी आणि पेढांबें दिलें आहे. वेल्होळी येथें राहून शेती-वाडीची व्यवस्था पाहात. भार्या भागीरथी. २ कन्या ३ पुत्र

(८) बया बाळकृष्ण मोरेश्वर - (उमा), भ्र. बळवंतराव गणपुले, गोंडीवणे (सं. भोर).

(८) मनु बाळकृष्ण मोरेश्वर  - मृ. स. १९३३. बालविधवा.

(८) त्र्यंबक बाळकृष्ण मोरेश्वर - ज. श. १७५८, मृ. श. १८१८. वेल्होळीस राहात. तेथून चुलते सदाशिव मोरेश्र्वर यांच्या आश्रयास बडोदें येथें गेले. तेथें सर्व्हे खात्यांत नोकरी होती. भार्या गिरिजा (सखू), मृ. स. १९०३ मे ७. वयाच्या ५८ व्या वर्षी. पि. मोरेश्र्वर हरि सोमण, बडोदें. २ कन्या

(९) भिकू त्र्यंबक बाळकृष्ण -भ्र. सीताराम विश्र्वनाथ वझे, बडोदें.

(९) येसू त्र्यंबक बाळकृष्ण - मृ. स. १९३०. भ्र. सदाशिवपंत केळकर, बडोदें.

(९) हरि त्र्यंबक बाळकृष्ण - ज. श. १८०४ वै. शु. ७. बडोदें येथें घरें बांधण्याचा धंदा करितात. शिवाय बांधकाम सामानाचें बडोदें येथें दुकानहि आहे. स्वतःच्या मालकीचें घर आहे. वास्तव्य दांडया बाजार, बडोदें. भार्या लक्ष्मी (मथुरा), ज. श. १८१२ मार्ग. व. १. पि. मोरेश्र्वर रामचंद्र फाटक, संगमेश्र्वर नंतर बडोदें. वि. श. १८१८. ३ कन्या २ पुत्र

(१०) शांता हरी त्र्यंबक - ज. श. १८२६. (लक्ष्मी)  भ्र. केशव गोविंद परांजपे, बडोदें, वि. श. १८३९.

(१०) तारा हरी त्र्यंबक -  ज. श. १८४०. (लक्ष्मी)  भ्र. पुरुषोत्तम दत्तात्रेय गद्रे, बडोदें. वि. श. १८५५.

(१०) इंदू हरी त्र्यंबक - ज. श. १८५५.

(१०) हनुमंत हरि त्र्यंबक - ज. श. १८४६ चै. शु. १५. मॅट्रिकचे वर्गात

(१०) रामेश्र्वर हरि त्र्यंबक - ज. श. १८४९ आश्वि. व. १३. हायस्कूल विद्यार्थी.

(८) दामोदर बाळकृष्ण मोरेश्वर - मृ. स. सुमारें १८९६. वेल्हवळीस शेती-माती आणि श्रीरामेश्र्वराची पूजा अर्चा करीत. भार्या राधा, ज. श. १७७७, मृ. श. १८३८ चै. शु. ११. पि. रावजी नामजोशी, नवलाख उंबरें (पुणें). ३ कन्या २ पुत्र

(९) कृष्णा दामोदर बाळकृष्ण -  मृ. श. १८२२. भ्र. कृष्णाजी बळवंत जोशी, वेल्हवळी.

(९) वेणू दामोदर बाळकृष्ण - ज. श.१७९७, मृ. श. १८४०. आंबेगांवच्या फाळक्यांकडे दिली. (

(९) यमू दामोदर बाळकृष्ण - ज. श.१८११, मृ. काशीक्षेत्री, श. १८६१. उकसाणच्या शिंत्र्यांकडे दिली. दोघीहि बहिणी बालविधवा असल्यामुळें माहेरी राहात. यमुताई वृत्तीनें अतिशय सात्विक आणि धार्मिक होत्या.

(९) वासुदेव दामोदर बाळकृष्ण - ज. श. १७९४, मृ. श. १८३९ चै. शु. ९. मॅट्रिक. प्रथम शिक्षक होते. नंतर मुंबईस सेक्रेटरीएटमध्यें नोकरी होती. यांनी वेल्हवळीस स्वतःचे घर आणि देऊळ बांधिले. श्रीरामेश्र्वराचा उत्सव मोठया आस्थेनें नि थाटानें करीत. हे अत्यंत धार्मिक नि

मातृभक्त होते. भार्या लक्ष्मी (गोदावरी) ज. श. १८०२, मृ. श. १८४६ पौ. शु. २. पि. गोविंद बाळकृष्ण दाबके, खालापूर. ३ कन्या २ पुत्र

(१०) व्दारका वासुदेव दामोदर - ज. श. १८१९. (रखमा), भ्र. नारायण सदाशिव जोशी, पुणे.

(११) चंद्रा वासुदेव दामोदर - ज. श. १८२३. लक्ष्मी भ्र. दत्तात्रेय बळवंत जोशी, मुंबई.

(१०) सुभद्रा वासुदेव दामोदर - ज. श. १८३६. (सगुणा), भ्र. शिवराम विद्याधर शिंत्रे, शास्त्री, एलफिन्स्टन् कॉलेज, मुंबई.

(१०) विश्र्वनाथ वासुदेव दामोदर - ज. स. १९०५ मार्च ३०. मॅट्रिक. लोणावळें येथें असिस्टंट ट्रान्स्पोर्टशन सुपरिटेंडेंटच्या कचेरींत कारकून आहेत. वास्तव्य भांगरवाडी, लोणावळें. भार्या गंगा (कमला) ज. श. १८३५. पि. बाबाजी गंगाधर जोशी, मांडवणें (कुलाबा). २ कन्या २ पुत्र

(११) ललिता विश्वनाथ वासुदेव -ज. स. १९२९ मे ९. इंग्रजी विद्यार्थिनी.

(११) मालती विश्वनाथ वासुदेव - ज. स. १९३३ आक्टो. १६. प्राथमिक विद्यार्थिनी.

(११) दत्तात्रेय विश्र्वनाथ वासुदेव - ज. स. १९३७ डि. ३.

(११) श्रीपाद विश्र्वनाथ वासुदेव - ज. स. १९४० फे. १६.

(१०) लक्ष्मण (नागेश) वासुदेव दामोदर - ज. स. १९१० मे १२. इंटर आर्ट्स आणि एस. टी. सी. उत्तीर्ण. १९३५ ते १९४० मध्यें शिक्षक होते. सध्यां लष्करी खात्यांत कारकून आहेत.

(९) नरसिंह दामोदर बाळकृष्ण - मृ. श. १८५५. फा. व. ४. त्या वेळी वय ५५. मराठी शिक्षण पूर्ण आणि थोडें इंग्रजी शिक्षण झालें होतें. वेल्हवळीस शेती करीत. भार्या उमा (चिमणी), मृ. श. १८५५ माघ शु. २. वयाच्या ४७ व्या वर्षी. पि. बाळकृष्ण मोरेश्र्वर जोशी. उकसाण (मावळ). २ कन्या ५पुत्र

(१०) गंगू नरसिंह दामोदर - (इंदिरा), भ्र. विनायक नारायण नेने, दादर. वि. श. १८५२.

(१०) शांता नरसिंह दामोदर -(सुमति), भ्र. त्र्यंबकराव वैद्य, वेणगांव.

(१०) विनायक नरसिंह दामोदर - ज. श. १८२३. इंग्रजी नि मराठी शिक्षण झालें आहे. ठाणें येथें दूध-दुभत्याचा धंदा करितात. भार्या सरस्वती (मनकर्णिका). पि. रामचंद्रराव फडके, पेण. वि. श. १८५२. २ कन्या १ पुत्र

(११) लीला विनायक नरसिंह - ज. स. १९३२ आक्टो. ३. मराठी तिसरी.

(११) कमला विनायक नरसिंह - ज. स. १९३७ ए. ६.

(११) मुकुंद विनायक नरसिंह - ज. स. १९४० सप्टें. १४.

(१०) दिनकर नरसिंह दामोदर - ज. श. १८२७. मॅट्रिक. जी. आय. पी. रेल्वेंत टिकिट कलेक्टर आहेत. वास्तव्य ठाणें. भार्या इंदिरा (चंद्रभागा), पि. गणेश विनायक मेहेंदळे, पाईट (पुणें). वि. श. १८५४. १ कन्या ३ पुत्र

(११) शालिनी दिनकर नरसिंह - ज. स. १९३६ ऑग. १३.

(११) अनंत दिनकर नरसिंह - ज. स. १९३३ आक्टो. २५. मराठी २ री.

(११) मधुसूदन दिनकर नरसिंह - ज. स. १९३९ जुलै ३०.

(११) श्याम दिनकर नरसिंह -ज. स. १९४१ ऑग. ४.

(१०) शिवराम नरसिंह दामोदर - ज. श. १८३१. इंग्रजी शिक्षण थोडें झालें आहे. वेल्हवळी येथें शेती करितात. भार्या सुशीला (अहल्या), गायनवादनाची आवड आहे. वि. श. १८५६.

(११) दामोदर शिवराम नरसिंह - ज. स. १९३८ जाने. २१.

(११) मधुकर (सदानंद) शिवराम नरसिंह - ज. स. १९४० मे.

(१०) कृष्णाजी नरसिंह दामोदर - ज. श. १८३७. शिक्षण थोडें इंग्रजी. दादर येथें खासगी नोकरी करितात.

(१०) विष्णु नरसिंह दामोदर - ज. श. १८४१. शिक्षण थोडें इंग्रजी. दादर येथें खासगी नोकरी .

(७)नारायण (दाजी) मोरेश्र्वर परशुराम - वेल्हवळीहून कुलाबा जिल्हांत सरदार बिवलकर यांचे आश्रयास गेले. अलिबाग तालुक्यांत मौजे पेढांवे येथें घरदार, जमीन-जुमला स्वतंत्र रीतीनें संपादिला. त्याचे पूर्वी त्र्यंबकला गेले असावे. तेव्हां त्यांनी वास्तव्य किहीम दिलें आहे. भार्या लक्ष्मी. अपत्ये १ कन्या ४ पुत्र

(८) वाराणशी नारायण मोरेश्र्वर - आवासच्या रानडे घराण्यांत दिली.

(८) प्रभाकर नारायण मोरेश्र्वर - मृ. सुमारें श. १७८५. चुलते सदाशिव मोरेश्र्वर यांचे आश्रयानें बडोद्यास आले. तेथें फौजदार होते. गणेश जनार्दन (७) यानी केलेल्या शक १७७८ च्या इच्छापत्रावर यांची साक्ष आहे. (ऐ. क्र. ५८ अ) भार्या जानकी, मृ. श. १८३७. पि. महादेव धोंडो जोशी, कोहीळ. ५ कन्या १ पुत्र

(९) आवडी प्रभाकर नारायण - पेणच्या करंदीकरांकडे दिली.

(९) द्वारका प्रभाकर नारायण - (अन्नपूर्णा), भ्र. वासुदेवराव गोखले, अलिबाग.

(९) साळू प्रभाकर नारायण - (रखमा), भ्र. गोपाळ वासुदेव पेंडसे, पेंडसेवाडी गिरगांव मुंबई.

(९) भीमा प्रभाकर नारायण - पेणच्या सान्यांकडे दिली.

(९) गोदू (मैना) प्रभाकर नारायण - भ्र. गोविंद बाळकृष्ण डोंगरे, बडोदें, मूळ चाफळ.

(९) नारायण प्रभाकर नारायण - ज. श. १७८१, मृ. स. १९२६ मार्च २. गायकवाड सरकारांत एंजिनिरिंग खात्यांत ओव्हरसीअर होते. पाणी-पुरवठयाचें विशेष ज्ञान होते. यांनी स. १८९८ साली परशुराम (चिपळूण) येथींल विनोदांची मिळकत सोडविली. सेवानिवृत्त झाल्यावर रसायन शास्त्राचा शोध लावण्यांत गुंतलेले असत. नाशिक जवळ कळवण तालुक्यांत कनाशी येथें जंगलांत रासायनिक प्रयोग करीत असतां निवर्तले. यांचे सर्व वैद्यकीय आणि संशोधनात्मक हस्तलिखित पुण्यास आयुर्वेद महाविद्यालयांत ठेविलें आहे. यांची वृत्ति पूर्ण स्वावलंबी आणि धार्मिक. स्वतःचा स्वयंपाक स्वतः करीत. नेहमी साधुसंतादिकांच्या समागमांत असत. खादीधारी. भार्या राधा (यमुना), पि. वामन नीळकंठ लेले आपटे (पनवेल). ३ कन्या २ पुत्र

(१०) महामाया तथा नर्मदा नारायण प्रभाकर - (सत्यभामा) भ्र. रा. सा. विष्णु वासुदेव पाटणकर, पुणें ४. वि. स. १९०६

(१०) रत्नप्रभा तथा सोनू नारायण प्रभाकर - ज. श. १८१८ फा. शु. ३. (गंगा) भ्र. गोविंद वासुदेव जोशी, नागपुर वि. श. १८३२.

(१०) अरुंधति नारायण प्रभाकर -  ज. श. १८२८. (सावित्री) भ्र. भास्कर दामोदर जोग, दादर. वि. श. १८४१.

(१०) बाबूराव (बृहस्पति) नारायण प्रभाकर  - ज. श. १८११ श्रा. व. ८. बडोदें येथें रेल्वे कॉन्ट्रॅ कॉन्ट्रॅक्टर आहेत. वास्तव्य विनोदबाग, बडोदें. भार्या तारा (नानीबाई), ज. श. १८१६ आश्विं. शु. १५. शिक्षण मराठी, पि. गणेश वामन फाटक, जुनागड. वि. स. १९०४. १ कन्या ६ पुत्र

(११) मोहिनी बाबुराव नारायण  - ज. श. १८३६ फा. शु. १५. ना. दा. ठा. विश्र्वविद्यालयाची प्रवेश परीक्षा आणि मुंबई विश्र्वविद्यालयाची मॅट्रिक उत्तीर्ण. मनोरमा भ्र. प्रा. त्र्यंबक पुरुषोत्तम लेले, बडोदें. वि. श. १८५४.

(११)चंद्रशेखर बाबूराव नारायण - ज. श. १८३४ भाद्र व. १३. बी. एस्सी. बी. टी. अहमदाबाद येथें गुजराथ कॉलेजांत डेमॉन्स्ट्रेटर आहेत. भार्या लीला (लीला), ज. स. १९१९ जून २०. बी. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण. पि. सदाशिव कृष्णाजी घाणेकर, नागपूर. वि. श. १८६१ वै. शु. २. २ कन्या

(१२) तिलोत्तमा चंद्रशेखर बाबुराव - ज. स. १९४१ मे. १०.

(१२) ज्योत्स्ना चंद्रशेखर बौरव -ज.स.१९४३

(११) गणनाथ बाबूराव नारायण - ज. श. १८३९ आश्विं. व.  १२. बडोदें सरकारची शिष्यवृत्ति घेऊन पुण्यास शेतकी कॉलेजमध्यें शिक्षण चालू आहे.

(११) त्रिविक्रम (वसंत) बाबुराव नारायण - ज. श. १८४२ पौ. व. ८. बी. ए. मुंबईस ट्रेडमार्क आफिसांत नोकरी आहे. क्रिकेटच्या खेळांत प्राविण्य मिळविलें आहे.

(११) मध्वनाथ बाबूराव नारायण - ज. श. १८४६ ज्ये. शु. ५. बडोदा कॉलेज मध्ये बी. ए. चा अभ्यास चालू.

(११) नागनाथ बाबूराव नारायण - ज. श. १८५० भा. शु. ५. इंग्रजी ७ वी.

(११) नीलनाथ बाबूराव नारायण - ज. श. १८५० भा. शु. ५. इंग्रजी ७ वी. नागनाथ नि नलिनाथ हे जुळे बंधु आहेत.

(१०) वसिष्ठ (गणेश) नारायण प्रभाकर - ज. श. १८१३, मृ. श. १८२४ उपनयनानंतर मृत.

(८) काशीनाथ नारायण मोरेश्वर - मृ. सुमारें स. १९०५. पेढांबे येथें राहात असत. धरमतर येथें यांनी खाणावळ काढली होती. अविवाहित.

(८) विष्णु (भाऊ) नारायण मोरेश्वर -- मृ. स. १९१४ डि. ७. तेव्हां वय ७९. पेढांबे येथें सावकारी करीत. श्रीकनकेश्र्वर मंदिराशीं यांचा कांही संबंध होता. भार्या (१) पार्वती (२) रमा (बगू), मृ. स. १८९१. वय ५०. पि. दिनकर नारायण दामले, रेवदंडा. ३ कन्या ४ पुत्र

(९) दुर्गा विष्णू नारायण -  मृ. श. १८५९ भा. शु. ८. वय ६४ भ्र. विठ्ठल वासुदेव सहस्त्रबुध्दे, खानाव (आलेबाग).

(९) काशी विष्णू नारायण -  पेण येथें दिली.

(९) रंगू विष्णू नारायण  - सीता  भ्र. रघुनाथ गंगाधर कर्वे, किहीम.

(९)गोविंद विष्णु नारायण - मृ. स. १९३६ जुलै २६. पेढाबें येथें राहात. शेती नि व्यापार करीत. यांचें मराठी नि संस्कृत शिक्षण बडोद्यास झालें. आजूबाजूच्या शेंकडों खेडयांतील गरीब शेतकऱ्यांना यांचा मोठा आधार असे. यांची वृत्ति अत्यंत दयार्द्र असून एक साधुपुरुष असा यांचा लौकिक होता. कनकेश्र्वर येथील श्रीगणपति संस्थानचे हे एक प्रमुख पंच होते. भार्या लक्ष्मी (मथुरा) यांना रामायण नि महाभारत चागलें अवगत असून यांनी पुष्कळ गाणी केली आहेत. अनेक व्रतर वैकल्यें, उपोषणें नि उपासना यांत यांची काळ जात असे. यांना थोडें संस्कृत येत असून या फार बहुश्रुत होत्या. पि. रघुनाथभट्टजी केळकर, नागाव. १ कन्या १ पुत्र

(१०) यमुना गोविंद विष्णू -(सत्यभामा), भ्र. कृष्णाजी रावजी आठवले अलिबाग.

(१०) धुंडीराज (अप्पा) गोविंद विष्णू -ज.स. १९०२ जा. १२. हे न्यायरत्न विनोद म्हणून सर्व हिंदुस्थानात प्रसिद्ध आहेत. हे मोडक-विनोद घराण्यांतील एक अत्यंत सुप्रसिद्ध नि विद्वान महापुरुष आहेत. यांची कीर्ति दिगंत पसरली आहे. हे, पाश्चात्य तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेऊन बी.ए. (ऑनर्स) नि एम.ए. झाले. नंतर विविध ठिकाणी संपादक प्राध्यापक अशी कामे करून अखेरीस पुणे येथील वाडिया कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅजुएट प्रोफेसर ऑफ फिलोसॉफी अँड सायकोलोजी म्हणून काम करीत होते. भार्या (१) सरस्वती मृ. श. १८४३ भाद्र. व. ६. वय सुमारे १६. बहिरोळे (अलिबाग) येथील आठवले घराण्यांतील (२) शारदा (द्रौपदी), मृ.स. १९३६. पि. लक्ष्मणराव फाटक, खोपवली. हिचा पुत्र प्रभाकर (३) मैत्रेयी (वेणू) ज.स. १९०८ सप्टें. २. शिक्षण एम.ए.सन१९३४ विवाह सन १९३७ पिता महादेव गोविंद अभ्यंकर, पुणे. त्या वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण संस्थात अधिकारी होत्या.त्यांना विविध खेळांची तसेच संगीताची आवड होती. अपत्ये २ कन्या ३ पुत्र

(११) कु.आदिती धुंडिराज गोविंद -

(११) कु.संहिता धुंडिराज गोविंद -

(११) प्रभाकर धुंडिराज गोविंद - ज. स. १९२७. फे. २४. शिक्षण चालू आहे.

(११) ऋषीकेश धुंडिराज गोविंद - ज. श. १८६० फा. शु. ११. मराठी १ ली.

(११) उदयन धुंडिराज गोविंद - ज. श. १८६५. चै. शु. १२.

(११) संप्रसाद धुंडिराज गोविंद -

(९) गोपाळ विष्णु नारायण - ज. स.१८७५ जून, २३. असिस्टंट सर्जन. आफ्रिकेंत नैरोबी येथें हॉस्पिटल असिस्टंट होते. स. १८९७-९८ त मुंबई हिंदु प्लेग हॉस्पिटल, क्षेत्रिय प्लेग हॉस्पिटलमध्यें, १८९९ मध्यें युगांडा रेल्वे ब्रिटिश ईस्ट ऑफ्रिकेंत काम केले. १९०३ साली मोंबासाहून कराचीस आजारी माणसांवर देखरेंख करीत आले. १९०५ मध्यें व्हिक्टोरिया लेक (किसम) येथें निद्रारोग रुग्जालयांत काम केले. १९०५-६ मध्यें नंदीफिल्ड फोर्सबरोबर होते. १९०६ साली एंबूच्या स्वारीवर गेले. १९१० मध्यें मोंबासा येथें हेल्थ ऑफिसर झाले. १९१४ साली किसमायूस गेले. त्यानंतर लागलींच सुदानी उष्ट्रपथकावर वैद्यकीय अधिकारी म्हणून गेले. गेल्या महायुध्दांत १९१५ सालीं युरोपियन हॉस्पिटलवर नैरोबी येथें होते. १९१६ साली आफ्रिकन बेस हॉस्पिटलमध्यें होते. १९१८ साली नेटिव्ह सिव्हिल हॉस्पिटलवर होते. १९२२

साली केनिया कॉलनीमधून सेवानिवृत्त झाले, यांना खालील लष्करी पदकें नि विजयचिन्हें मिळाली आहेत (१) नंदी स्वारीबद्दल एक पदक आणि विजय चिन्ह. (२) एंबू स्वारीबदद्दल विजयचिन्ह. (३). गेल्या महायुध्दामध्यें एक चांद, एक विजयपदक आणि (४) सर्व नोकरीबद्दल एक विशिष्ट नीळा चांद मिळाला आहे. यांनी पेढाबें येथें बंगला बांधिला आहे. शिवाय दादर येथे ह्यांच्या दोन चाळी आहेत.वास्तव्य बिर्ला मॅन्शन सँढहर्स्ट रोड.मुंबई ४ भार्या भागीरथी (दुर्गा पिता चिंतामणी त्र्यंबक जोशी रा.चौल) अपत्ये  कन्या  पुत्र

(१०) गणेश गोपाळ विष्णू - ज.स.१९०९ सप्टें.१७, बी.ए. एल.एल.बी. मुंबई हायकोर्ट मध्ये ॲडव्होकेट शिवाय न्यू स्वस्तिक विमा कंपनीचे कार्यवाह होते.भार्या यशोदा ज.स. १९१५ जुलै १८ (कु.यमू पिता पुरषोत्तम त्र्यंबक कर्वे रा.अक्षी) वि.स. १९२८ अपत्ये कन्या  पुत्र

(९) लक्ष्मण विष्णू नारायण  - मृ.स. १९३९ मार्च पेढांबे येथून पुण्यास गेले. उत्तम याद्निक व वैदिक.श्रौताध्ययनही केले.होते.यांनी काही विद्यार्थी पढविले. अत्यंत कर्मनिष्ठ व सत्वशील यांनी सुमारे  ३० वर्षे स्मार्ताग्नि ठेविला होता.भार्या गंगा पिता श्रीधर बाळकृष्ण भट रा.बहिरोळे अपत्ये १ कन्या ४ पुत्र

(१०) कु सिंधू लक्ष्मण विष्णू  - वि.स. १९४१ भ्र.रामचंद्र गोविंद जोशी रा.पुणे ह्या सन १९४५ मध्ये  मॅट्रिक परीक्षेस बसल्या होत्या.

(१०) जनार्दन लक्ष्मण विष्णू  - मॅट्रिक पुण्यास मॉडर्न एजुकेशन सोसायटी च्या शाळेत शिक्षक होते.नंतर लष्करी खात्यात नोकरी केली. भार्या कमला (गंगू पिता लक्ष्मण केशवशास्त्री रिसबूड) शिक्षण ट्रेनिंगचे २ रे वर्ष झाले आहे.पुण्याच्या डी.ई. सोसायटीच्या नविन मराठी शाळेत शिक्षिका अपत्ये कन्या  पुत्र

(१०) श्रीकृष्ण लक्ष्मण विष्णू  - शिक्षण मॅट्रिक पर्यंत पुण्यास हवामान खात्यात नोकरी हे. मोडक असे उपनाव लावतात भार्या मंगला (कु.यमुना पिता वासुदेव काशिनाथ रानडे रा.पनवेल) मराठी शालांत परीक्षा उत्तीर्ण अपत्ये कन्या पुत्र

(१०) माधव लक्ष्मण विष्णू - शिक्षण मॅट्रिक पर्यंत पुण्यास गंधर्व महाविद्यालयात गायनाचा अभ्यास ७/८ वर्षे केला. नंतर तेथे संगीत शिक्षक होते.

(१०) नारायण लक्ष्मण विष्णू -ज.स. १९२३  मिलिटरी मेकॅनिकल ड्रायव्हर

(९) परशुराम विष्णू नारायण - सन.१९४० मध्ये बालाजी छत्रीके सामने हनुमान का गुपचूप मंदिर, दारागंज लष्कर,ह्या ठिकाणी राहत होते.शास्त्री आहेत.भार्या अन्नपूर्णा

(१०) दत्तात्रय परशुराम विष्णू - सुरवातीस मुंबईस पोलीस खात्यात होते.नंतर बेळगावकडे लष्करी नोकरीत गेले.

(८) गंगाधर नारायण मोरेश्वर - पेढांबे येथे राहत असत.

(५) रामचंद्र बाळकृष्ण यादव - हे.सन १८०० च्या सुमारास विद्यमान असावेत. पुण्यास दुसरे बाजीराव पेशवे यांच्या राजवटीत शनिवार वाड्या मध्ये रामचंद्र गोसावी यांची लळिते होत असत असा उल्लेख आढळतो. ते रामचंद्र गोसावी कदाचित हेच असावेत.यांनी आपले वास्तव्य बोरिवली दिले आहे.

(६) जनार्दन रामचंद्र बाळकृष्ण - शके.१७२९ मधील बोरिवलीच्या खोती हक्कासंबधी निवडा पत्रकात ते पक्षकार म्हणून उपस्थित होते.यांनी आपले वास्तव्य करंजगाव - कर्यात मावळ दिले आहे.

(७) गणेश जनार्दन रामचंद्र - मृत्यू शके १७७८ नंतर किहीम येथे राहत. तेथे त्यांचे घर होते.तसेच मौजे बोरीस नि बेडगुराचे येथे जमिनी होत्या. यांनी शके १७७८ मध्ये विनोद घराण्याची सामाईक मिळकत आणि स्वतःची मिळकत यांचे इच्छापत्र केले. (ऐ.क्र.५८ अ) त्यानंतर हे महायात्रेस गेले.भार्या सरस्वती या बाईनी महायात्रेहून आल्यानंतर बोरीवालीची अर्धी खोती आणि परशुराम येथील सर्व मिकात गहाण टाकली.अपत्ये १ कन्या १ पुत्र

(८) कु.काशी गणेश जनार्दन - भ्र.नारायण भास्कर टिळक रा.वरसई (पेण)

(८) भार्गव(कोंडो) गणेश जनार्दन - मृ.श. १७७७ च्या सुमारास वयाच्या १८ व्या वर्षी. वेल्हवळीहून गोवित्रीस जाताना इंद्रायणी नदीत बुडून वारले.

(६) रघुनाथ लक्ष्मण बाळकृष्ण - भार्या अन्नपूर्णा

(७) पांडुरंग रघुनाथ लक्ष्मण - हे त्र्यंबकच्या लेखात वास्तव्य कल्याण देतात. भार्या रखमा

(६) बापू (भिकू) लक्ष्मण बाळकृष्ण - शके १७२९ च्या निवडा पत्रकात यांचा उल्लेख आहे.यांचे आबा असे नावही होते असे दिसते.

(७) गोपाळ बापू लक्ष्मण - गणेश जनार्दन यांनी शके १७७८ मध्ये केलेल्या व्यवस्थापत्रकात यांचे नाव आहे आणि मिळकतीतील भागाची स्पष्टता केली आहे.

(८) विठ्ठल गोपाळ बापू - मृ.स.१८९८ वेल्हवळीस शेती करीत.

(५) दिनकर बालकृष्ण यादव - शके १७२९ च्या निवडा पत्रकात यांचा उल्लेख आहे.

(६) धोंडो दिनकर बाळकृष्ण - नशील, त्र्यंबक येथील लेखावरून यांचे नाव समाविष्ट केले.आहे.

(६) गोविंद सदाशिव बाळकृष्ण - भार्या राधा या बाई आपले वास्तव्य करंजगाव कर्यात मावळ देतात

---

## घराणे क्र. १२ पंचनदी - विनोद

पृष्ठ २५८ वरून

१२ कु. मिनाक्षी दत्तात्रेय बापुराव - ज. दि.०६-०८-१९४२ बी.ए.बी.एड. शिक्षीका वि. दि.०४-१२-१९७३ भ्र. राजाराम भिकाजी गोंधळेकर रा. अहमदाबाद

१२ गजानन दत्तात्रेय बापुराव - ज.दि.२१-०८-१९२८/मृ.दि.१७-१२-१९७८ मॅट्रीक अहमदाबाद इलेक्ट्रीक कंपनीत नोकरी वि. दि.२८-०२-१९५८ भार्या रोहिणी (कु. कुसुम दत्तात्रेय दातीर रा.) ज. दि.१७-०४-१९३४ गृहिणी अपत्ये २ कन्या.

१३ कु. मृदुला गजानन दत्तात्रेय - ज.दि.२२-१२-१९५९ बी.ए. टेलिफोन कंपनीत नोकरी वि. दि.११-११-१९८३ भ्र. अतुल दत्तात्रेय देवपुरकर रा. बडोदे

१३ कु. वैशाली गजानन दत्तात्रेय - ज.दि.२५-०१-१९७२ बी.कॉम.खासगी कं. नोकरी वि. दि.२१-०१-१९९४ भ्र. कमलेश द. पुणतांबेकर रा.

१२ कृष्ण दत्तात्रेय बापुराव - ज.स. १९३२/ मॅट्रीक निवृत्त सर्व्हे ऑफ इंडीया, वि. दि.२४-०५-१९६२ भार्या रजनी (कु. मालती कृष्णराव देशपांडे रा. ) ज. दि.१३-११-१९३८ मॅट्रीक बी.पी.एन.ए. नर्सिंग गृहिणी अपत्ये ३ कन्या.वास्तव्य अहमदाबाद

१३ कु. वंदना कृष्ण दत्तात्रेय - ज.दि.१३-०८-१९६३ बी.ए. गृहिणी वि. दि.३०-०३-१९८६ भ्र. विवेक श्रीपाद जोशी रा. जयपुर (राजस्थान)

१३ कु. अंजना कृष्ण दत्तात्रेय - ज.दि.१९-०९-१९६६ बी.ए. गृहिणी वि. दि.२१-०६-१९८९ भ्र. संदीप वचुभाई निम्बार्क रा. अहमदाबाद

१३ कु. मंगला कृष्ण दत्तात्रेय - ज.दि.१९-०५-१९७० बी.ए. गृहिणी वि. दि.१९-१२-१९९२ भ्र. प्रताप भालचंद्र रांजणगांवकर रा. बडोदा.

१२ प्रभाकर दत्तात्रेय बापुराव –ज.दि.०८-०६-१९३५ एफ.वाय.बी.एस.सी. निवृत्त टेलीफोन कंपनी भार्या सुनंदा ज. दि.०७-०२-१९४४ मृ. दि.०१-०६-२०१४ इंटर शिक्षक पदविका अपत्ये १ पुत्र. वास्तव्य अहमदाबाद

१३ हेमंत प्रभाकर दत्तात्रेय - ज.दि.२०-१२-१९६७ नेत्र विषयक तंत्र पदविका नोकरी ऑप्टोमेट्रीस्ट, वि. दि.०४-०५-१९९२ भार्या शिल्पा ज. दि.१०-०६-१९७० बी.कॉम. अपत्य १ पुत्र.वास्तव्य बडोदा

१४ शंतनु हेमंत प्रभाकर - दि.२६-०८-१९९३ बी.टेक.ईले./ कंप्युटर नोकरी इन्फोसीस सोफ्टवेअर इंजिनिअर.

१२ शरद दत्तात्रेय बापुराव - ज.दि.०४-०५-१९४८ डी.सी.ई. निवृत्त अभियंता नर्मदा प्रकल्प वि. दि.२१-०३-१९७६ भार्या शैलजा (पिता पांडूरंग मोरेश्र्वर करंदीकर रा. नासिक) ज. दि.०१-०५-१९५६ एम.ए. बी.एड. प्राथमिक शिक्षीका अपत्ये २ पुत्र. वास्तव्य अहमदाबाद

१३ केतन शरद दत्तात्रेय - ज.दि.२१-०२-१९७७ बी.एस.सी. एम.सी.ए. नोकरी सोफ्टवेअर इंजिनिअर यू.एस.ए. भार्या छाया (पिता मधुकर अनंत संभुस) ज. दि.१२-१०-१९७९ बी.कॉम. गृहिणी अपत्ये १ कन्या १ पुत्र.

१४ कु. आदिती केतन शरद - ज.दि.१०-०३-२००६ प्राथमिक शिक्षण चालू.

१४ सिध्दार्थ केतन शरद - ज दि.०९०२-२०१० प्राथमिक शिक्षण चालू

१३ केदार शरद दत्तात्रेय - ज.दि.३०-०१-१९८० बी.ए.एम.सी.ए. कंप्युटर खासगी कंपनीत नोकरी सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर अहमदाबाद वि. दि.२२-०२-२००१ भार्या फाल्गुनी (पिता नरेंद्रभाई रतीलाल शुक्ला) ज. दि.०३-०८-१९८२ एम.ए.एम,एड.स्टेट बॅंकेत नोकरी अपत्ये १ पुत्र. वास्तव्य अहमदाबाद

१४ आदित्य केदार शरद - दि.१८-१०-२०१० प्राथमिक शिक्षण चालू

११ कु. वत्सला नारायण यादव - भ्र. विष्णू वामन मराठे रा. बडोदा

११ चिंतामणी नारायण यादव - ज. दि.०५-०९-१९२४ मृ. दि.२०-१०-१९७८ मॅट्रीक नोकरी

पश्चिम रेल्वे भार्या आशा (कु. दुर्गा मोरेश्र्वर फडके रा. सूरत) ज.स.१९२९ मृ.स.२०१० ४थी पास गृहिणी अपत्ये १ कन्या २ पुत्र.

१२ विद्या चिंतामणी नारायण - ज. दि.३०-०४-१९६१ बी.कॉम सरकारी नोकरी वि. दि.१९-०६-१९८७ भ्र. सुनील शारंगपाणी रा. बडोदे.

१२ विजय चिंतामणी नारायण - ज. दि.१४-१०-१९५६ बी.कॉम एल्.एल्.बी निवृत्त संयुक्त सचीव गुजरात राज्य वि.स.१९८४ भार्या पद्माजा (पिता श्रीपाद जुगल रा. बडोदा) ज. दि.१३-१२-१९६० बी.कॉम गृहिणी अपत्य १ पुत्र.वास्तव्य गांधीनगर

१३ हेमंत विजय चिंतामणी - ज. दि.०९-१०-१९८५ बी.टेक (इले) एम्.बी.ए.(यु.एस.ए.) चार्टर्ड फायनान्शीयाल ॲनालीस्ट नोकरी प्रकल्प अधिकारी टाटा स्पेसीफीक मॅनेजमेंट ग्रुप मुंबई वि. दि.२९-०१-२०१२ भार्या कु. अपुर्वा मनोहर वैद्य रा. ठाणे ज. दि.२८-११-१९८८ एम्.कॉम कंपनी सेकेटरी गृहिणी अपत्य १ पुत्र.

१४ कनिष्क हेमंत विजय - ज. दि.१०-०८-२०१५ बालवाडीत.

१२ विनय चिंतामणी नारायण - ज. दि.०६-०८-१९६३ मृ. जाने १९९८ बी.ई. अविवाहीत.

११ वसंत नारायण यादव - ज. दि.०२-०२-१९२८ मृ. दि.१९-०१-२००७ आर्कीटेक्ट पदविका निवृत्त इंजिनिअर प. रेल्वे वि. स.१९५० भार्या (कु. निर्मला मोरीश्र्वर गोखले रा. मुंबई) अपत्ये १ कन्या १ पुत्र सन १९६२ मध्ये घटस्फोट घेतला .

१२ कु. चित्रा वसंत नारायण - ज.स.१९५४ १०वी पर्यंत गृहिणी भ्र. प्रमोद अनंत सोहोनी रा. बडोदा.

१२ सतीश वसंत नारायण - ज. दि.०४-०८-१९५१ बी.ए निवृत्त सेवासदन संस्था बडोदा वि. दि.३१-०५-१९७५ भार्या शीतल (कु. विजया विष्णूपंत वालोडकर रा ) ज. दि.०५-११-१९५२ मॅट्रीक निवृत्त सेवासदन संस्था अपत्ये १ कन्या १ पुत्र वास्तव्य बडोदा

१३ मयुरीका सतीश वसंत - ज. दि.१३-०९-१९७७ एम्.कॉम. नोकरी बडोदे विद्यापिठ, वि.दि. ०९-१२-२००१ भ्र. रविद्र मराठे रा. बडोदे

१३ अमोल सतीश वसंत - ज. दि.२७-०५-१९७९ एम्.कॉम खासगी कंपनीत नोकरी वेब डिझायनर वि. दि.१४-१२-२००६ भार्या कादंबरी (पिता कौशीक फाटक रा. अहमदाबाद) ज. दि.२९-०४-१९८३ बी.कॉम गृहिणी अपत्य १ कन्या वास्तव्य बडोदा

१४ कु. पावनी अमोल सतीश - ज. दि.०१-०६-२००९ प्राथमिक शिक्षण सुरु.

११ मुकुंद नारायण यादव - ज.स.१९३०/मृ.स.२००२ मॅट्रीक निवृत्त पोस्टखाते, वि.स.१९५५ भार्या मंगला (कु. कमला वसंत जोशी रा. पेण) ज.स.१९३२ मृ.स.२००७ निवृत्त नर्स अपत्ये १ पुत्र.

१२ डॉ. घनशाम मुंकुद नारायण - ज. दि.२७-१२-१९५७ एम्.डी त्वचातज्ञ वैद्यकीय व्यवसाय वि.स.१९८५ भार्या कु. सुरेखा शशीशेखर पांढरीपांडे रा. नागपुर ज. दि.१०-०१-१९५९ एम्.डी स्त्रीरोगतज्ञ वैद्यकीय व्यवसाय अपत्ये १ कन्या १ पुत्र. वास्तव्य बडोदा

१३ कु. विशाखा धनःशाम मुकुंद - ज. दि.२८-०५-१९२२ एम्.बी.बी.एस् चे शिक्षण सुरु.

१३ अपूर्व घनशाम मुकुंद - ज. दि.२२-११-१९८६ एम.टेक. इंजिनियर नोकरी टाटा कन्सलटंसी सर्व्हीसेस मुंबई.

पृष्ठ २६१ वरून

११ कु. ललीता विश्र्वनाथ वासुदेव - ज. दि.०९-०५-१९२९ मॅट्रीक गृहिणी.

११ कु. मालती विश्र्वनाथ वासुदेव - ज. दि.१६-१०-१९३३ एम्.ए.बी.एड शिक्षीका वि. भ्र. माधव रा. ठाणे.

११ दत्तात्रेय विश्र्वनाथ वासुदेव - ज.स.१९३७ मृ.स.१९९४ बी.ए भार्या नीता (कु. शांता यशवंत रानडे रा. पुणे) ज.स.१९३७ मृ.स.२०१५ मॅट्रीक गृहिणी अपत्ये १ कन्या १ पुत्र.

१२ कु. मंजुषा दत्तात्रेय विश्र्वनाथ - ज. दि. बी.कॉम नोकरी वि.

१२ हितेंद्र दत्तात्रेय विश्र्वनाथ - ज. दि.१७-०५-१९५९ १२वी, हॉटेल मॅनेजमेंट नोकरी वि.स भार्या मनीषा (कु. प्रिया अनील सबनीस रा. मुंबई) ज. दि.२९-११-१९६२ १२वी नोकरी अपत्ये १ कन्या वास्तव्य बदलापूर

१३ कु. मिताली हितेंद्र दत्तात्रेय - ज. दि.१९-११-२००० उच्च माध्यमिक शिक्षण

११ श्रीपाद विश्र्वनाथ वासुदेव - ज. दि.१८-०२-१९४० मृ. दि.०२-०६-२012 आय.टी.आय पदविका नोकरी वि. दि.२८-०२-१९५५ भार्या वसुधा (कु. पुष्पा केशव इनामदार रा. ) ज. दि.०४-०८-१९४३ बी.ए.बी.एड निवृत्त शिक्षीका अपत्ये १ कन्या १ पुत्र.वास्तव्य ठाणे

१२ कु. वर्षा श्रीपाद विश्र्वनाथ - ज. दि. बी.ए.बी.एड शिक्षीका वि.स. भ्र. श्रीकांत वासुदेव कुलकर्णी रा.

१२ विवेक श्रीपाद विश्र्वनाथ -दि.१२-११-१९७० बी.ई केमीकल, नोकरी वि. दि.०१-०६-१९९८ भार्या मानसी (कु. सुजाता विनायक जोशी रा. ) ज. दि.३१-१२-१९७४ एम.ए.इकोनॉमिक्स प्राध्यापक अपत्य १ पुत्र. वास्तव्य ठाणे

१३ अभिषेक विवेक श्रीपाद - ज. दि.२२-०४-२००० उच्च माध्यमिक शिक्षण सुरु.

१० लक्ष्मण वासुदेव दामोदर - ज.दि.१२-०५ -१९१० मृ.स.१९९७ इंटर आर्ट्स, एस.टी.सी. शिक्षक नंतर लष्करात वय ३५ ते ४० हँडलूम कमिशन मुंबई येथे नोकरी भार्या शकुंतला गृहिणी अपत्ये १ पुत्र

११ गणेश लक्ष्मण वासुदेव - ज.दि.०८-०६-१९५४ बी.ए. जी.सी.डी.इंडो बर्मा पेट्रोल कंपनीत नोकरी चीफ मॅनेजर अॅडमिनीस्ट्रेशन वि.दि.२३-०५-१९७८ भार्या मानसी (कु.आशा कमलाकर मराठे रा.बेळगाव) ज.दि.०२-०१-१९५६ मॅट्रिक गृहिणी अपत्ये १ कन्या १पुत्र वास्तव्य कांदिवली

१२ संपदा गणेश लक्ष्मण - ज.दि.२७-०५-१९७९ एम.बी.ए. मार्केटिंग डेप्युटी जनरल मॅनेजर आय.बी.एम.कंपनी

१२ निखिलेश गणेश लक्ष्मण - ज.दि.१०-०५-१९८० बी.ई. ईलेक्ट्रोनिक्स नोकरी डेल कॉमप्युटर

११ कु. शालीनी दिनकर नरसिंह- ज. दि. मॅट्रीक गृहिणी वि. दि. शशीकला भ्र. विनायक सोहोनी रा. कल्याण.

११ कु.कुंदा दिनकर नरसिंह - १२ व्या वर्षी मृत्यू
११ अनंत दिनकर नरसिंह - ज. दि.२५-१०-१९३३ मृ.स.१९९१ मॅट्रीक, दुध व्यवसाय अविवाहीत.
११ मधुसुदन दिनकर नरसिंह - ज. दि.३०-०७-१९३९ बी.कॉम निवृत्त पर्यवेक्षक ठाणे मेंटल हॉस्पिटल वि. दि.१०-०७-१९८१ भार्या सविता (कु. अलका केशव वैद्य रा. ठाणे) ज. दि.२९-१२-१९५२ मृ. दि.१०-०५-२०१० १२वी पास गृहिणी अपत्ये २ पुत्र. वास्तव्य ठाणे
१२ प्रसाद मधुसुदन दिनकर - ज. दि.२१-०६-१९८२ एम्.बी.ए मार्केटींग नोकरी TV9 चॅनल वि. दि.१२-१२-२००९ भार्या कु. श्रुती शरद पेंडसे रा. ठाणे ज. दि.२४-०४-१९८४ बी.कॉम गृहिणी अपत्य १ पुत्र. वास्तव्य ठाणे
१३ आयुष प्रसाद मधुसुदन - ज. दि.२७-०३-२०१२ प्राथमिक शिक्षण चालू
१२ अमोल मधुसुदन दिनकर - ज. दि.१७-११-१९८३ एम्.बी.ए एच.आर. नोकरी बिर्ला लाईफ इंन्शुअरन्स, वि. दि.०९-१२-२०१२ भार्या कु. निलीमा अनंत देशपांडे रा. ठाणे ज. दि.१२-०२-१९७६ एम्.बी.ए मार्केटीग नोकरी सोमय्या कॉलेज वास्तव्य ठाणे
११ शाम दिनकर नरसिंह - ज. दि.०४-०८-१९४१/मृ. दि.२९-११-२०१४ मॅट्रीक निवृत्त रेल्वे लिपीक, वि. दि.१४-०५-१९७४ भार्या शुभा (कु. नलीनी रंगनाथ पाटणकर रा. बारामती) ज. दि.२६-०७-१९४८ मॅट्रीक गृहिणी विनापत्य वास्तव्य पुणे
११ सुहास दिनकर नरसिंह - ज. दि.२५-१२-१९४५ जी.सी.डी आयुर्विमा एजंट अविवाहीत वास्तव्य ठाणे
११ विलास दिनकर नरसिंह - ज. दि.१२-०३-१९४९ बी.ए निवृत्त ग्लॅक्सो कं. नंतर सल्लागार अविवाहीत. वास्तव्य ठाणे
पृष्ठ २७४ वरून
११ कु. आदिती धुंडीराज गोविंद - ज. दि.२४-०३-१९४१ बी.ए.ऑनर्स.एल.एल.बी. १९६४, १९६५ पासून पुण्यात वकीली सुरु महाराष्ट्र राज्य स्त्री वकील परीषदेच्या व पुणे बार असो. पहिल्या महिला सचिव, उपाध्यक्ष व अध्यक्ष तसेच रोटरी क्लब पुणे अपटाउनच्या पहिल्या अध्यक्ष सामाजिक कार्यातही सहभाग महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळाच्या मुख्य विश्र्वस्त दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात वि. दि.१४-०६-१९६६ भ्र. मधुकर नारायण वैद्य रा.पुणे बी.कॉम एल.एल.बी.
११ कु. संहीता धुंडीराज गोविंद - ज. दि.२२-०५-१९४८/मृ.स.२००७ आर्किटेक्ट व गृहिणी वि. दि.२५-१०-१९७२ भ्र.जगदिश शहा आर्किटेक्ट रा.पुणे कॅप.
११ प्रभाकर धुंडीराज गोविंद - दि.२४-०२-१९२७/ मतीमंद होते.
११ हृषीकेश धुंडीराज गोविंद - ज. दि.०२-०३-१९३९ एम.ए. पी.एच.डी. सुवर्ण पदक प्राप्त (हॉर्वर्ड विद्यापीठ यू.एस.ए.) प्राध्यापक वि.स.१९६९ भार्या अरुंधती (कु. विदयालता जोशी रा. नागपुर) ज. दि.३०-१२-१९४२ एम.एम.बी.एस. स्त्रीरोग तज्ञ अमेरीकेत स्वतःचे हॉस्पिटल अपत्ये १ कन्या
१२ कु. ऋता हषिकेश धुंडीराज - ज. दि.०३-०९-१९७२ एम.एस. स्त्रीरोग तज्ञ नोकरी वि.

स.२००४ भ्र. डेल कन्हौस यू.एस.ए.

११ उदयन धुंडीराज गोविंद - दि.१७-०४-१९४३ बी.ई.एम.एस. (कोलंबीया विद्य्पीठ यू.एस.ए.) नोकरी व सल्लागार वि.स.१९७३ भार्या शीला (पिता पागनीस रा. मुंबई) ज.दि.१९-०३-१९५१ एम.एम.बी.एस. एम.डी. पॅथॉलॉजी अपत्ये १ कन्या १ पुत्र.

१२ कु. केतकी उदयन धुंडीराज - ज.दि.१८-०९-१९८३ नेत्रविशारद व्यवसाय यू.एस.ए.

१२ शचिंद्र उदयन धुंडीराज - ज.स.१९७५ ॲडव्होकेट सन २०१३ मध्ये अपघाती मृत्यु

११ संप्रसाद धुंडीराज गोविंद - ज. दि.०८-०७-१९४९ एम.बी.बी.एस.,एम.डी. पी.एच.डी डी.एस.सी (ए.एम.) वैद्यकिय व योगोपचार वि. दि.२१-१२-१९८१ भार्या ॠजुता (कु. प्रतिभा हरिभाऊ देवधर रा. पुणे) एम.डी. अनेस्थेशिया पी.जी.डी. समुपदेशन व मानसोपचार अपत्ये २ पुत्र.वास्तव्य पुणे

१२ समन्वय संप्रसाद धुंडाराज - दि.०७-०६-१९८३ मतीमंद

१२ सनातन संप्रसाद धुंडीराज - दि.१९-०४-१९८८ बी.कॉम. पी.जी.डी.ए.सी. ऑस्ट्रेलिया, स्पोर्ट सायन्स, स्पोर्ट मानसशास्त्र व डिजीटल मार्केटींगच्या पदव्या प्राप्त.

पृष्ठ २७५ वरून

१० गणेश गोपाळ विष्णू - ज.दि.१७-०९-१९०९ बी.ए. एल.एल.बी. मुंबई हायकोर्टात वकील व स्वस्तिक विमा कंपनीचे कार्यवाह वि.दि.०८-०३-१९२८ भार्या यशोदा (कु.यमू पुरुषोत्तम कर्वे रा.अक्षी )ज.दि.१८-०५-१९१५ विनापत्य

१० चिंतामण गोपाळ विष्णू - मॅट्रिक भार्या रेवती मृ.स्.१९७८ अपत्ये २ कन्या २ पुत्र

११ कु.माधुरी चिंतामणि गोपाळ -

११ कु. ज्योस्त्ना चिंतामणी गोपाळ -

११ अशोक चिंतामणि गोपाळ -

१० अनंत गोपाळ विष्णू - मॅट्रिक नोकरी अविवाहित

१० मधुसूदन गोपाळ विष्णू - डी.ई.ई.निवृत्त रेल्वे वि.स्. १९५६ भार्या मालती (कु.शालिनी केळकर रा पालगड )ज.स्.१९३८ मृ.स्.२००८ १० वि पास गृहिणी अपत्ये २ कन्या १पुत्र

११ कु सुगंधा मधुसूदन गोपाळ- ज.स्.१९५८ १० वि पास गृहिणी वि.स्.१९७८ भ्र चंद्रकांत जोगळेकर रा.अंधेरी

११ कु संध्या मधुसूदन गोपाळ - ज.स्.१९६० बी.एस.सी नोकरी स्टेट बॅंक वि.स्.१९८४ भ्र.शामकांत वीरकर रा.मुलुंड

११ विघ्नराजेन्द्र मधुसूदन गोपाळ - ज.दि. २९-०३-१९६९ बी.कॉम.नोकरी बी.ई.एस.टी. व मुद्रण व्यवसाय वि.स्. १९९६ भार्या (कु.प्रज्ञा वसंत दामले रा.वांगणी ) शिक्षण एम.ए.गृहिणी अपत्ये २ कन्या वास्तव्य डोंबिवली

१२ कु.स्वरदा मधुसूदन गोपाळ - ज.स्.१९९८ महाविद्यालयीन शिक्षण चालू

१२ कु. सानिका मधुसूदन गोपाळ - ज.स्.२००२ उच्च्य माध्यमिक शिक्षण सुरु

१० महादेव गोपाळ विष्णू - शिक्षण १० वि नोकरी भार्या (कु शैलजा दातार रा.पेण) अपत्ये १

कन्या १पुत्र

११ कु.शर्मिला महादेव गोपाळ - बी.कॉम.गृहिणी वि.स्.१९९८ भ्र.आनंद नेने रा.डोम्बिवली

११ शेखर महादेव गोपाळ - १२ वी पास नोकरी विनापत्य

११ कु. पुष्पा जनार्दन लक्ष्मण - दि.१८-०२-१९४५ एम.एस.सी. निवृत्त अधिकारी बँक ऑफ बरोडा वि. दि.२३-१२-१९६९ नंदीता भ्र. निलकंठ दत्तात्रेय जोशी रा. पुणे १६

११ प्रभा जनार्दन लक्ष्मण - दि.१२-०१-१९५० बी.एस.सी वि. दि.१२-१२-१९७१ जयश्री भ्र. रविंद्र बाम रा. पुणे. ९

११ चिंतामणी जनार्दन लक्ष्मण - दि.२५-०१-१९४७ बी.एस.सी.बी.लिब. निवृत्त ग्रंथपाल वि.दि.२३ मे १९७६ भार्या वृषाली (कु. सुनीता प्रभाकर आगाशे रा. ठाणे) दि.१०-०३-१९५२ एम.ए. संगीत विशारद गृहिणी अपत्ये १ कन्या १ पुत्र. वास्तव्य ठाणे

१२ कु. आदिती चिंतामणी जनार्दन - दि.२९-१०-१९८१ बी.एई. इलेक्ट्रीकल, टाटा कन्सलटन्सीत नोकरी वि. दि.२३-११-२००४ भ्र. गिरीश रमेश फडके रा. पुणे.

१२ अव्दैत चिंतामणी जनार्दन - दि.२७-०४-१९८३ बी.ई.मेक. जेकब कंपनीत नोकरी वि. दि.२५-०२-२०१२ भार्या अमृता (कु. अमृता अनंत दामले रा. ठाणे) ज. दि.२९-११-१९८७ एम.कॉम. स्टेट बॅंकेत नोकरी अपत्ये वास्तव्य ठाणे

११ अरविंद श्रीकृष्ण लक्ष्मण - ज.दि.१८-०७-१९५२ एम.कॉम. आय.सी.डब्यू.ए. निवृत्त कॉस्ट अकौंटंट वि. दि.३०-०६-१९८३ भार्या पुष्पा पिता श्रीकृष्ण जोशी ज.दि.१५-१२-१९५७ बी.कॉम.बी.कॉम. ओरीएटल बॅक ऑफ कॉमर्स मध्ये अधिकारी अपत्ये २ पुत्र.वास्तव्य पुणे

१२ रोहन अरविंद श्रीकृष्ण - ज.दि.१२-०५-१९८५ बी.फार्मा,एम.एस. बायोटेक सिंटेल कंपनीत नोकरी

१२ आलोक अरविंद श्रीकृष्ण - ज.दि.१०-११-१९८७ सी.ए. व्यवसाय

११ मकरंद श्रीकृष्ण लक्ष्मण - ज.दि.१५-११-१९५० डी.एम.ई. निवृत्त वि. दि.१५-०३-१९७९ भार्या स्मिता (कु. मंगला पाडूरंग रिसबुड रा. ) ज.दि.२२-०२-१९५१/मृ.दि.२०-०७-२००८ बी.ए. गृहिणी अपत्ये १ कन्या १ पुत्र.वास्तव्य पुणे

१२ कु. अमिता मकरंद श्रीकृष्ण - ज.दि.१७-०७-१९८४ एम.कॉम. नोकरी वि. दि.

१२ आमोद मकरंद श्रीकृष्ण - ज.दि.२०-०४-१९८० संगणक पदविका नोकरी सिनेकॉन कंपनीत वि. दि.१९-०४-२००९ भार्या (कु. गौरी पिता विजय गोपाळ गद्रे रा. पाली) ज. दि.१६-११-१९८५ बी.कॉम. गृहिणी अपत्य १ कन्या वास्तव्य पुणे

१३ कु. सुरभी आमोद मकरंद - दि.१६-११-२०१० शिक्षण सुरु

११ मिलींद श्रीकृष्ण लक्ष्मण - ज.स.१९५४ विजया दशमी एम.कॉम. निवृत्त पदमजी पेपर मिल चिंचवड अविवाहीत वास्तव्य पुणे

१० नारायण लक्ष्मण विष्ण् - ज. दि.३०-१०-१९२३ मृ. दि.२३-०८-२००४ सैन्यदलात मेकॅनीकल ड्रायव्हर होते.वि. भार्या सुशिला (कु. शकुंतला महादेव गोडसे वैजनाथ कर्जत रायगड) डी.एड मुंबई म.न.पा शिक्षीका अपत्ये १ कन्या १ पुत्र

११ कु. शुभांगी नारायण लक्ष्मण - ज. दि.०८-१०-१९५४ बी.ए गृहिणी वि.स.१३ मे १९७७ अनघा भ्र. कै. अनील रामचंद्र जोशी रा. मुंबई

११ प्रदिप नारायण लक्ष्मण - दि.२१-०२-१९५७ बी.ए. मार्कटींग ट्रेडींग सल्लागार वि. दि.०५-०१-१९८६ भार्या रत्ना (कु. सुषमा शरद शेंडे रा. कल्याण) ज. दि.२४-१०-१९६१ १२वी ठाणे कोर्टात कारकून स्वेच्छ निवृत्ती गृहिणी अपत्ये १ कन्या १ पुत्र.वास्तव्य डोंबिवली

१२ कु. तेजश्री प्रदिप नारायण - दि.३०-०४-१९८७ बी.ए. रशियन भाषा, व्यवसाय दुभाषी.

१२ अजिंक्य प्रदिप नारायण - दि.०९-१२-१९९० एम.एम.एस. नमुरा, जपानी कंपनीत नोकरी.